**हप्ते न भरल्या जाणाऱ्या २५ हजार रुपयांपर्यंतच्या लघुकर्ज खात्यांच्या हिशोब पूर्ण करणे.**

बीपी. बीसी. ५३/२१.०४.११७/ २००१-०२

२२ डिसेंबर २००१

सार्वजनिक क्षेत्रातल्या सर्व बँकाचे
अध्यक्ष तसंच व्यवस्थापकीय संचालक,

माननीय महोदय,

**२५ हजार रुपयांपर्यंतच्या हप्ते न भरल्या जाणाऱ्या लघुकर्ज खात्यांच्या एक रकमी हिशोब पूर्ण करणे.**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांबरोबर १२ नोव्हेंबर, २००१ रोजी झालेल्या बैठकीत माननीय अर्थमंत्र्यांनी असं सूचित केले की, बँकांच्या २५ हजार रुपयांपर्यंतच्या थकित कर्ज खात्यांनी वसूली करण्यासाठी बँकांनी एक निश्चित अशी योजना तयार करावी. अर्थमंत्र्यांच्या या सूचनेच्या अनुषंगाने, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची संचालक मंडळे, खाली दिलेले निकष लक्षात घेऊन अशा थकित कर्जाची वसुली करण्यासाठी, निश्चित अशी योजना तयार करू शकतात,

## २ (अ). व्याप्तीक्षेत्र

अ. ३१ मार्च १९९८ या तारखेला, ज्या कर्जखात्यांची मूळ मुद्दलाची (व्याजाचा घटक वगळता) २५ हजार रुपयांपर्यंतची थकबाकी आहे अशा सर्व विभागातल्या कर्ज खात्यांना, मग कर्ज देण्याचा हेतू काहीही असो किंवा हे कुठल्याहि व्यवसायासाठी दिलेला असो, ही मार्गदर्शक तत्त्वे लागू होतात.

ब. जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत अशा कर्ज खात्यांना हे निकष लागू होतात. एकदा अशा खात्यांच्या थकबाकीची वसुली झाली की मग न्यायालयातून खटला काढून घेण्यासाठी ती बँक योग्य ती पावले उचलू शकते.

क. मात्र असे असले तरी, घोटाळा करणाऱ्या, बेकायदेशीर पध्दतींचा वापर करून कर्ज घेतलेल्या किंवा स्वतःहून हप्ते न भरणाऱ्या खातेदारांना ही योजना लागू होणार नाही.

ड. ही मार्गदर्शक तत्त्वे ३० जून २००२ पर्यंत अंमलात राहतील

**(ब) थकबाकीचा हिशोब चुकता करण्याची पध्दत - रक्कम आणि वसुलीसाठी तारखेची** निश्चिती:-

वर जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, खातेदारांकडून ज्या रकमेची वसुली झाली आहे, ती रक्कम ३१ मार्च, १९९८ या दिवशीपर्यंतच्या मूळ मुद्दलातून वळती केली जाईल. ३१ मार्च, १९९८ या तारखेनंतर मूळ रकमेवर जे काही व्याज लागले असेल, त्या वाढीव रकमेला थकबाकीतून माफी दिली जाईल.

**(क) बँकेकडे थकबाकी जमा करण्याची पध्दत**

जे कर्जदार वर सांगितलेल्या नियमावलीनुसार आपली थकबाकी चुकती करु इच्छितात, त्यांनी ती एक रकमी करवी. मात्र जे खातेदार खरोखर कर्जाचे मुद्दल परत करतील असे बँकेला वाटत असेल, त्यांना ते हप्त्याहप्त्याने परत करण्याची सूट बँक देऊ शकते. पण असे करताना, त्यांनी पहिल्या हप्त्यात कर्जाच्या किमान २५ टक्के रक्कम भरली पाहिजे. तर उरलेली रक्कम त्यानंतरच्या एका वर्षाच्या कालावधीत बँकेकडे जमा केली पाहिजे.

**(ड) कर्जांचा हिशोब लावण्याचा अधिकार कोणाला असावा ?**

लघु कर्जखात्यांचा हिशोब मिटवण्याचे अधिकार संपूर्णपणे, त्या त्या शाखेच्या व्यवस्थापकाला देण्यात येतील. पण जर एखाद्या कर्जदाराला त्याच व्यवस्थापकाने कर्ज मंजूर केले असेल तर अशा परिस्थितीत हे प्रकरण त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपवले जाईल.

**(इ) भेदभाव केला जाऊ नये.**

बँकांनी वर सांगितलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर, कुठलाही भेदभाव न करता, ज्या कर्जखात्यांचे हप्ते भरले जात नाहीत अशा सर्व कर्जखात्यांचा हिशोब पूर्ण करण्यासाठी करावा.

**(ई) धोरण तयार करणे.**

वर दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कर्जखात्यांच्या थकबाकीच्या एक रकमी वसुलीसाठी बँकांना स्वतःची लेखांकन पध्दत सुरू करण्याची मुभा आहे.

**(फ) जाहिरात**

वर उल्लेख केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे, आपली थकबाकी बँकेकडे जमा करण्याची संधी, सर्व पात्र कर्जदारांना मिळावी म्हणून बँकांनी या योजनेची पुरेशी जाहिरात करणे गरजेचे आहे.

**(ट) संचालक मंडलाकडून आढावा घेतला जावा**

या प्रकरणाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याने, अशा प्रकरणात कर्जदारांकडून परत येणाऱ्या थकबाकीच्या प्रगतीची माहिती आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे, तसेच आपल्या मुख्य कार्यालयाकडे द्यावी. तसेच ज्या प्रकरणांचा हिशोब पूर्ण झाला आहे, अशा प्रकरणांचा, बँकेच्या संचालक मंडळानी मासिक आढावा घ्यावा.

३. कृपया या परिपत्रकाची पोच द्यावी.

**आपला विश्वासू,**
**एम. आर. श्रीनिवासन**
**प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक**